# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ६३५/२०२३

**अपिलार्थी, श्री.सुदेश रोहरा**
३०१, गायत्री अपार्टमेंट, देवनी भवानी मंदिर
नेहरु चौक, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००२

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पर्यावरण विभागप्रमुख, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

जन माहिती अधिकारी,उद्यान विभाग (सार्व.बांध विभाग अंतर्गत), उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.११.२०२२ | --- | १२.०१.२०२३ | --- |

. अपिलार्थी यांनी दि. ०६.०३.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *"PIO PWD has not responded within time limits mentioned under RTI act २००५. FAA failed to conduct hearing & has not passed any order till today. treating "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संदिप जाधव, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"

1) *Please provide the names &qualification of officers & Staff working for 1.Plantation of trees, 2. RE plantation of trees, 3. Trimming of trees, 4. Cutting/Razing of trees, 5. Removing of the trees, 6.Axing of trees.*
2) *Provide the location with full address & names of trees (i) Planted (ii0 Re-planted (iii) trimmed (iv0 Razed (v) cut upto bottom (vi) removed from the land.*
3) *Provide the total no.of trees planted in each & every year since 2017.*
4) *Provide the certified copy of all orders received from Civic Body/Maharashtra government for Plantation or Re-plantation of trees.*
5) *Provide the names of Newspaper in which it is published for Plantation or Re-plantation of trees.*
6) *Provide the copy of work order & contract agreement made with contractor for plantation or Re-plantation of trees.*
7) *Provide the certified copy of Budget allocation for each year.*
8) *Provide the certified copy of complaint received for illegally cutting the trees.*
9) *Provide the total number of trees planted in each & Every Garden of Ulhasnagar.*
10) *Provide the certified copy of approval received from standing committee/General Body Meeting/Mahasabha for plantation or Re-plantation of trees. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, मुद्या क्र.०३, व ०९ ची माहिती प्राप्त झालेली आहे. तथापि इतर मुद्यांची माहिती प्राप्त झालेली नाही. सदरचा मुळ अर्ज हा पर्यावरण विभागाकडे सादर करण्यात आला होता. पर्यावरण विभागाने सदर विषय हा सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने, सदर माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यामुळे प्रथम अपील दाखल करण्यात आले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही किंवा कोणताही आदेश पारित केला नाही. तद्नंतर द्वितीय अपील दाखल केल्यानंतर वरिलप्रमाणे मुद्या क्र.०३ व ०९ ची माहिती देण्यात आलेली आहे. परंतु इतर मुद्यांबाबत अद्यापपर्यंत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी यांच्या या युक्तीवादाचे व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही. आता विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्या क्र.०३ व ०९ ची माहिती वगळून इतर सर्व मुद्यांची माहिती विनामुल्य पुरविणे योग्य होईल. यापैकी जी माहिती इतर विभागाशी संबंधित असेल, ती माहिती त्या विभागाकडून प्राप्त करुन पुरविणे योग्य होईल.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलर्थी यांना माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता (सेवानिवृत्त), सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहितीपैकी मुद्या क्र.०३ व ०९ ची माहिती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती ३० दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** यापैकी जी माहिती इतर विभागाशी संबंधित असेल, ती माहिती त्या विभागाकडून प्राप्त करुन घेऊन, अपिलार्थी यांना वर नमूद केलेल्या मुदतीत पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता (सेवानिवृत्त), सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २१.११.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ जून, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता (सेवानिवृत्त), सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे.

-यांना प्रत
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुयश बांगर,
कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.
यांचे मार्फत प्रत रवाना.